**नि. फौ. ख. क्र.३२०/२०१७**

सरकार वि. अजित कारंडे व इतर.

**नि.क्र.४१**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी**

मी शपथेवर कथन करते की,

**माझे नाव– बायडाबाई महादेव कारंडे ,**

वय–४६ वर्षे, व्यवसाय–घरकाम,

रा.निमसाखर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. पी. कुचेकर, यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

महादेव कारंडे माझे पती आहेत. विनोद माझ्या दिराचा मुलगा आहे. पोपट कारंडे हा माझा दिर आहे. आरोपी अजित माझ्या दिराचा मुलगा आहे. आरोपी दिलीप माझा दिर आहे. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत. दि.१२/०५/२०१७ रोजी संध्याकाळी ०६.०० वाजता विहिरीचे पाण्याची मोटार चालू करण्यासाठी माझे पती गेले होते. त्यानंतर विहीरीचे ठिकाणाहून आरडाओरडाचा आवाज आला. त्यानंतर मी विहीरीच्या ठिकाणी गेले. त्या ठिकाणी आरडाओरडा चालू होता. आरोपी अजित व दिलीप हे माझ्या पतीला खाली पाडून मारहाण करत होते. माझ्या पतीचे डाव्या बाजूची बरगडी फ्रॅक्चर झाली. माझ्या पतीला घरी आणले व दवाखान्यात नेले. त्यानंतर दुस–या दिवशी पोलीस स्टेशनला जावून फिर्याद दिली. अजित याने दगड मारल्यामुळे माझ्या पतीची बरगडी फ्रॅक्चर झाली. आता मला मी दिलेली फिर्याद दाखविली. ती तीच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझा अंगठा आहे. **फिर्यादीस नि.क्र.४२** देण्यात येते. पोलीसांनी पुन्हा येवून घटनास्थळ पंचनामा केला. मी पोलीसांना घटनास्थळ दाखविले. मी घटनेतील दगड दाखविल्यास ओळखू शकते. **आज रोजी मुद्देमाल दाखविण्यास**

**<u>मिळून न आल्यामुळे सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

**( ए. बी. पाटील)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

**दि.०६/०२/२०२५**

इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.